कोरोना विषाणूचाप्रादुर्भाव रोखण्यासाठी लावण्यात आलेल्या लॉकडॉऊनमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठीकेंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत वित्तीय सहाय्य पॅकेजअंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत तसेच कोणत्याही राज्य योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या विनाशिधापत्रिकाधारकांना माहे मे व जून, २०२० या दोन महिन्याच्या कालावधी करिता मोफत तांदूळ वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः अधापू - २०२० /प्र.क्र.७०/ ना.पु.२२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १९ मे, २०२०

**वाचा :-१)** शासन पत्र दिनांक ३१ मार्च, २०२०
२) शासन निर्णय क्रमांकः अधापू - २०२० /प्र.क्र.६१/ ना.पु.२२, दि.९ एप्रिल, २०२०
३) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.७-१/२०१९-BO-III (pt) (i), date १५.५.२०२०
४) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.७-१/२०१९-BO-III (pt) (ii), date १५.५.२०२०
५) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६३/संगणक कक्ष दिनांक २४.०४.२०२०

**प्रस्तावना -**

देशातील कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट असलेल्या लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल ते जून,२०२० या कालावधीसाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत तसेच APL शेतकरी योजनेत समाविष्ट न झालेल्या APL (केशरी) शिधापत्रिकाधारकांना माहे मे व जून, २०२० या दोन महिन्याच्या कालावधीत सवलतीच्या दरात अन्नधान्याचा लाभ देण्यात आला आहे. तथापि, या योजनां व्यतिरिक्त विना शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचा लाभ देण्यात आला नाही. COVID-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये विस्थापित मजुरांच्या हाल अपेष्टा कमी करण्यासाठी आत्मनिर्भर भारत वित्तीय सहाय्य पॅकेजअंतर्गत जे विस्थापित मजूर लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेच्या शिधापत्रिका नाहीत, त्यांना केंद्र शासनाने मे व जून २०२० या दोन महिन्याकरिता प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो अन्नधान्य मोफत देण्याची घोषणा केली असून त्यानुसार राज्यातील विना शिधापत्रिकाधारक सर्व विस्थापित मजुरांना ५ किलो अन्नधान्य मोफत देण्याचे निर्देश संदर्भाधीन पत्रान्वये केंद्र शासनाने दिले आहे.

सदर निर्देशानुसार माहे मे व जून, २०२० करिता राज्यातील विनाशिधापत्रिकाधारकाना मोफत तांदूळ वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned by CamScanner

**शासन निर्णय:-**

१. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लावण्यात आलेल्या लॉकडॉऊनमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र शासनाच्या आर्थिक उपाययोजनाअंतर्गत आत्मनिर्भर भारत वित्तीय सहाय्य पॅकेजअंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत किंवा कोणत्याही राज्य योजनेत समाविष्ट नसलेल्या विना शिधापत्रिकाधारक व्यक्तींना **माहे मे व जून, २०२० या दोन महिन्याच्या** कालावधीकरिता **प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो तांदूळ मोफत** देण्याबाबत याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. लाभार्थ्यांचे निकष :-

i. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमधील शिधापत्रिकेसाठी अर्ज केला आहे, परंतु अद्याप पर्यंत शिधापत्रिका प्राप्त न झालेले व्यक्ती.

ii. अन्न धान्याची गरज असलेले सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विस्थापित मजूर, रोजंदारी मजूर.

iii. संदर्भ क्रमांक ५ च्या पत्रान्वये प्रलंबित असलेले सर्व शिधापत्रिकाधारक.

iv. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच इतर राज्य योजनेतील शिधापत्रिकाधारक यातून पूर्णपणे वगळण्यात येतील.

३. **मोफत तांदूळ** वितरणाची कार्यपद्धती -:

अ) मजुरांच्या स्थलांतरासाठी केलेल्या नियोजनामधून प्राप्त आकडेवारी **कामगार / मजूर /** अशा बिगर कार्डधारकांची यादी जिल्हाधिकारी यांनी निश्चित करावी यासाठी NDMA नॅशनल डिज्स्टर मॅनेजमेन्ट)ॲथोरिटी ( यांच्या संकेतस्थळावरील यादी तहसिलदार , जिल्हा परिषदेव्दारे / महानगरपालिकेव्दारे ,यांचेकडे प्राप्त झालेल्या याद्यायाकरीता वाटप होत असलेले लाभार्थी यांच्या याद्या विचारात घ्याव्यात अशा रितीने .जिल्हा पातळीवर तयार झालेल्या लाभार्थ्यांची यादी स्वस्त धान्य दुकान निहाय व केंद्र निहाय धान्य वाटप संख्या निश्चित करावी .त्याप्रमाणे धान्याचे नियतन निश्चित करावे .हे करताना त्या - त्या क्षेत्रांतील पोलीस विभाग नगरपरिषद /नगरपालिका / महानगरपालिका ,कामगार विभाग , व उद्योग विभागातील प्रतिनिधीचा समावेश करण्यात यावा ,जेणेकरून लाभार्थी निश्चित करणे सोपे जाईल.

आ)त्या त्या केंद्रातील / त्यांच्या क्षेत्रातील विस्थापित मजुरांच्या संख्येनुसार क्षेत्रातील अन्न धान्य वितरण केंद्रे निश्चित करुन त्याकरीता अन्न धान्य केंद्रप्रमुख नेमावा. सदर वितरण केंद्रांची यादी व केंद्र निहाय लाभार्थी संख्या यांची माहिती जिल्हाधिकारी केंद्रप्रमुख नियुक्त करतील यांनी संबधित जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी / नियंत्रक शिधा वाटप यांना द्यावी. संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी / उपनियंत्रक शिधावाटप अधिकारी / तहसिलदार यांनी भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून तांदळाची उचल करुन केंद्र निहाय तांदूळ उपलब्ध करुन



Scanned by CamScanner

द्यावा. विहित केलेल्या केंद्रावरील लाभार्थी दुसऱ्या केंद्रावर जाऊन तांदळाचा लाभ घेणार नाहीत यांची दक्षता घ्यावी

इ) परिच्छेद 2 मध्ये नमूद केल्याप्रमाणे केंद्रे रास्त भाव दुकान अथवा वितरणाकरीता सोयीचे असलेले ठिकाण संबंधित जिल्हाधिकारी निश्चित करतील व सदर केंद्रे रास्तभाव दुकानाशी जोडून देण्याबाबत संबंधीत पुरवठा अधिकारी यांची जबाबदारी असेल व तसेच तांदूळ उतरवून घेण्याची जबाबदारी वाहतूकदाराची असेल.

ई) केंद्र प्रमुखाने त्याच्या केंद्रावर प्राप्त होणाऱ्या अन्नधान्याची स्विकृती संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/उपनियंत्रक/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ तहसिलदार यांना द्यावी . केंद्र प्रमुखाने त्याच्या केंद्रावर स्वीकृत व वितरण झालेले अन्नधान्य याबाबत अभिलेख तयार करावा या करिता आवश्यक विवरणपत्रे संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/ उप नियंत्रक /अन्न धान्य वितरण अधिकारी/ तहसिलदार यांनी केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावी.

संबधित जिल्हा पुरवठा अधिकारी/उप नियंत्रक / अन्नधान्य वितरण अधिकारी/ तहसिलदार यांच्याकडून ५० किलोच्या पोत्यामध्ये तांदूळ केंद्र प्रमुखांना उपलब्ध करण्यात येईल. लाभार्थ्यांना ५ किलोच्या विहित परिमाणात तांदूळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबधित केंद्र प्रमुखाची राहील.

उ) प्रत्येक वितरण केंद्रावर तांदूळ वितरीत करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वृंद उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल. तसेच याकरीता त्या त्या क्षेत्रातील दक्षता समितीच्या सदस्यांची, महानगरपालिका क्षेत्रात संबंधित नगरसेवकांची, ग्रामीण क्षेत्रात ग्रामसेवक / सरपंच यांची मदत घेण्यात यावी.

ऊ) प्रत्येक वितरण केंद्रावर गर्दी टाळण्यासाठी Physical Distance नियमांचे पालन करुन लाभार्थ्यांना तांदूळ वितरीत करण्यासाठी पुरेसा कर्मचारीवृंद उपलब्ध करण्याची जबाबदारी त्या त्या स्तरावरील केंद्र प्रमुखाची राहील.

४. या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रामध्ये तक्त्यातील जिल्हानिहाय नियतनाच्या परिमाणानुसार लाभार्थीना मोफत तांदळाचे तात्काळ वितरण करावे. सदर मोफत तांदळाचे वाटप करताना जिल्हानिहाय दर्शविलेल्या कमाल मर्यादेची खातरजमा करुन जिल्हा पुरवठा अधिकारी / उपनियंत्रक शिधा वाटप अधिकारी /अन्नधान्य वितरण अधिकारी/ तहसिलदार यांनी खात्री करावी. संबधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्याचे नियतन विचारात घेऊन त्यांच्या अधिनस्त विविध क्षेत्रांतील लाभार्थी संख्येनुसार क्षेत्रनिहाय तांदळाचे नियतन संबधित क्षेत्राच्या केंद्र प्रमुखांना द्यावे. कोणत्याही परिस्थितीत जिल्ह्याकरिता विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक तांदळाचे वितरण होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घेण्यात यावी.

५. सदर विना शिधापत्रिकाधारक लाभार्थीना ऑफलाइन धान्य वितरण करण्यात यावे. अशा लाभार्थ्यांकडून त्यांचा आधारकार्ड नंबर जो प्रमाणित (valid) असेल किवा शासनाकडून देण्यात आलेली कोणतेही ओळखपत्र पाहून त्याची स्वतंत्र नोंद करावी. अशा लाभार्थ्यांची स्वतंत्र नोंद करावी व त्यांचे तपशील



Scanned by CamScanner

जिल्हा पुरवठा कार्यालयास कळविण्यात यावेत. यासाठी जिल्हाधिकारी शिव भोजन ॲप अथवा जिल्ह्यात उपलब्ध करुन दिलेले कोणतेही मोबाईल ॲपद्वारे लाभार्थ्यांची निश्चिती, वाटपाच्या वेळी घेण्यात येणा-या नोंदी / तपशिल गोळा करण्यासाठी वापर करु शकतील, आवश्यक तपशिल म्हणजे नाव, आधारकार्ड नंबर ( नसल्यास मोबाईल नंबर) वाटप दिनांक, ॲप सपोर्ट करीत असल्यास त्याचा फोटो इत्यादी बाबींचा समावेश करण्यात यावा.

६. सदर तांदळाचे वाटप तात्काळ करावयाचे आहे. संबंधीत जिल्ह्याने आपल्याकडील तांदळाचा उपलब्धतेनुसार व वाहतूकीचे नियोजनानुसार शक्य असल्यास मे व जून चे नियतन एकत्रित द्यावे तथापि तसे शक्य नसल्यास त्या त्या महिन्याचे विहित कालमर्यादेत वाटप करावे. कोणत्याही परिस्थितीत जिल्ह्याकरिता विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक तांदळाचे वितरण होणार नाही याची दक्षता जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी घ्यावी. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / उपनियंत्रक शिधावाटप यांनी सदर तांदळाचे वाटप तात्काळ करावयाचे असल्याने त्यांच्याकडील शिल्लक असलेल्या अन्य योजनेतील साठ्यामधून वाटप सुरु करावे व तद्नंतर तांदळाचे समायोजन करण्यात यावे.

७. माहे मे करिता नियतन उचलण्याचा दिनांक ३१.५.२०२० व जून महिन्याचे नियतन उचलण्याचा दिनांक १५.६.२०२० असून ही नियतन उचलण्याची अंतिम तारीख आहे. सदर योजनेच्या वाटपाबाबतच्या तपशिलांचे संकलन करुन दैनंदिन अहवाल शासनास दररोज सादर करावा. सदर नियतनाच्या उचलीस मुदतवाढ मिळणार नाही. विहित केलेल्या कालावधीत तांदळाची उचल करण्यास कसूर करणाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

८. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून तांदूळ स्वीकारून शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे तांदळाचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्रीकरून तांदळाची उचल करण्यात यावी. या संबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, तसेच सदर संयुक्त तपासणी च्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाचे व शासनाचे प्रतिनिधी यांचे नाव, पद, तपासणीचा दिनांक व स्थळ या बाबतची जिल्हानिहाय माहिती अन्न धान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी .

९. लाभार्थांना वितरण केंद्राच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप विहित पद्धतीने होत असल्याची खातरजमा संबधित क्षेत्रातील समितीने करावी . अन्न धान्याचे वाटप विहित पद्धतीने होत नसल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्थावीत करण्यात येईल.

१०. सार्वजनिक वितरण करावयाचा नियंत्रण आदेश 2015 मधील तरतुदी तसेच संदर्भ पत्र क्र.२ नुसार तांदळाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सदर कार्यवाही दिनांक १५.७.२०२० पर्यंत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी / उपनियंत्रक शिधा वाटप अधिकारी /अन्नधान्य वितरण अधिकारी/ तहसिलदार यांची राहील.



Scanned by CamScanner

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्याwww.maharashtra.gov.in वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांकक्रमांक असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सतिश सुपे)
शासनाचे सह सचिव

सहपत्र :-वरील प्रमाणे

प्रत,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्य मंत्री यांचे सचिव,
मा.उप मुख्य मंत्री यांचेसचिव,
मा.मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
मा.मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव,
मा.मंत्री, पणन यांचे खाजगी सचिव,
मा.मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री, अन्न,नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव,
मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
अपर मुख्य सचिव, (वित्त)महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
प्रधान सचिव, कृषि व प.दु.म.विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई,
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्रस्टेटको.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.,
कनमूर हाऊस, नरसीनाथा स्ट्रीट,मुंबई- ४०० ००९,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,
आदिवासी विकास भवन, २ रामाळा, रामगणेशगडकरीचौक, जुनाआग्रारोड,नाशिक-२,
सर्व विभागीयआयुक्त.
नियंत्रक (शिधावाटप)वसंचालकनागरीपुरवठा(गो/वा),मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उपआयुक्त (पुरवठा),
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
सर्व अन्न धान्य वितरणअधिकारी,
वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.



Scanned by CamScanner

सर्व उपसचिव/अवरसचिव/सर्वअधिकारी,अ.ना.पु.वग्रा.सं.विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई,
सर व्यवस्थापक,(महा.) भारतीयअन्नमहामंडळ, ५ वामाळा, राजेंद्रनगर, दत्तपाडारोड, बोरीवली पूर्व मुंबई-४०० ०६६,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( ५ प्रती ),
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,ग्रंथालय ६ वामजला,विधानभवन,मुंबई. (१०प्रती)
मान्यता प्राप्त राजकीय पक्ष यांचे कार्यालये, ( प्रत्येकी ५ प्रती ),
सर्वविधानपरिषदसदस्यवविधानसभासदस्य
सर्वविरोधीपक्षनेते./निवडनस्ती (नापु-२९).

************



Scanned by CamScanner

# विवरणपत्र "अ"

शासन निर्णय क्र.अधापू २०२०/प्र .क्र. ७० /नापु -२२, दिनांक १९.५.२०२० सोबतचे विवरणपत्र "अ"

कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतर्गत तसेच कोणत्याही राज्य योजनेची शिधापत्रिका नसलेल्या विनाशिधापत्रिकाधारकांना माहे मे व जून, २०२० या दोन महिन्याच्या कालावधी करिता प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो वितरीत करावयाच्या मोफत तांदळाचे मासिक नियतन

| अ.क्र. | जिल्हा | कार्डसंख्या | लाभार्थी सदस्य संख्या AAY | लाभार्थी सदस्य संख्या PHH | Total NFSA लाभार्थी सदस्य संख्या | १०% of NFSA लाभार्थी सदस्य संख्या | मासिक नियतन (मे.टन) तांदूळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | A Region | ३३०७ | १४२५६ | ७२२६१० | ७३६८६६ | ७३६८७ | ३६८ |
| | D Region | २६२१ | ११२९९ | ९८१०५९ | ९९२३५८ | ९९२३६ | ४९६ |
| | E Region | ४७४२ | २०४४३ | २१२४८८९ | २१४५३३२ | २१४५३३ | १०७३ |
| | F Region | १४९६८ | ६४५२७ | २८०४६९५ | २८६९२२२ | २८६९२२ | १४३५ |
| | G Region | ४२०३ | १८११९ | ११९०६२४ | १२०८७४३ | १२०८७४ | ६०४ |
| २ | ठाणे | ५०४०० | २१७२७४ | ५९४७१९ | ८११९९३ | ८११९९ | ४०६ |
| ३ | पालघर | ९२३७८ | ३९८२४२ | १४७९०७९ | १८७७३२१ | १८७७३२ | ९३९ |
| ४ | रायगड | ८४१८४ | ३६२९१७ | १४८९६३० | १८५२५४७ | १८५२५५ | ९२६ |
| ५ | रत्नागिरी | ४१२७९ | १७७९५४ | १०६३३६७ | १२४१३२१ | १२४१३२ | ६२१ |
| ६ | सिंधुदुर्ग | २६०७२ | ११२३९६ | ६८३८०० | ७९६१९६ | ७९६२० | ३९८ |
| ७ | नाशिक | १७८६५४ | ७७०१७७ | २८८३७३२ | ३६५३९०९ | ३६५३९१ | १८२७ |
| ८ | धुळे | ७७२२२ | ३३२९०४ | ११९९०७२ | १५३१९७६ | १५३१९८ | ७६६ |
| ९ | जळगाव | १३५८९३ | ५८५८३५ | २२३०७७३ | २८१६६०८ | २८१६६१ | १४०८ |
| १० | नंदुरबार | ९७४३३ | ४२००३४ | ७२७४८३ | ११४७५१७ | ११४७५२ | ५७४ |
| ११ | अहमदनगर | ९२८०३ | ४०००७४ | २७१०६०१ | ३११०६७५ | ३११०६८ | १५५५ |
| १२ | पुणे ग्रामीण | ५१६११ | २२२४९५ | २४८८२८७ | २७१०७८२ | २७१०७८ | १३५५ |
| १३ | पुणे शहर | १२२०० | ५२५९४ | १३४६२३० | १३९८८२४ | १३९८८२ | ६९९ |
| १४ | सोलापूर ग्रामीण | ५५२२६ | २३८०७९ | १७७८४२७ | २०१६५०६ | २०१६५१ | १००८ |
| १५ | सोलापूर शहर | ८३१२ | ३५८३३ | ५३७६०६ | ५७३४३९ | ५७३४४ | २८७ |
| १६ | कोल्हापूर | ५६४९५ | २४३५५० | २३६५२११ | २६०८७६१ | २६०८७६ | १३०४ |
| १७ | सांगली | ३४२९८ | १४७८५९ | १७९५८७१ | १९४३७३० | १९४३७३ | ९७२ |
| १८ | सातारा | ३२५२९ | १४०२३३ | १७२२८१९ | १८६३०५२ | १८६३०५ | ९३२ |
| १९ | औरंगाबाद | ६७११९ | २८९३५० | १९६२८२७ | २२५२१७७ | २२५२१८ | ११२६ |
| २० | जालना | ४६३२४ | १९९७०३ | १३३६६०८ | १५३६३११ | १५३६३१ | ७६८ |
| २१ | नांदेड | ८०४८८ | ३४६९८४ | १९२८९०२ | २२७५८८६ | २२७५८९ | ११३८ |
| २२ | बीड | ३५०९५ | १५१२९५ | १४१६५१० | १५६७८०५ | १५६७८१ | ७८४ |
| २३ | उस्मानाबाद | ४०७१२ | १७५५०९ | १०५५७०६ | १२३१२१५ | १२३१२२ | ६१६ |
| २४ | परभणी | ४३६५५ | १८८१९७ | १०२०६२० | १२०८८१७ | १२०८८२ | ६०४ |
| २५ | लातूर | ४३७०० | १८८३९१ | १५३८२१७ | १७२६६०८ | १७२६६१ | ८६३ |
| २६ | हिंगोली | ३०७७० | १३२६४९ | ७७८९७० | ९११६१९ | ९११६२ | ४५६ |
| २७ | अमरावती | १२२६४२ | ५२८७१० | १३९२४४४ | १९२११५४ | १९२११५ | ९६१ |
| २८ | वाशीम | ५०५२९ | २१७८३१ | ८३९८९४ | १०५७७२५ | १०५७७३ | ५२९ |
| २९ | अकोला | ४५९२३ | १९७९७४ | ११२९३४० | १३२७३१४ | १३२७३१ | ६६४ |
| ३० | बुलढाणा | ६६७५८ | २८७७९४ | १५६७१०३ | १८५४८९७ | १८५४९० | ९२७ |
| ३१ | यवतमाळ | १२२६२२ | ५२८६२३ | १४६४०२३ | १९९२६४६ | १९९२६५ | ९९६ |
| ३२ | नागपूर ग्रामीण | ७५८८३ | ३२७१३२ | १२८८२०३ | १६१५३३५ | १६१५३४ | ८०८ |
| ३३ | नागपूर शहर | ४६०७८ | १९८६४२ | १४२४८४१ | १६२३४८३ | १६२३४८ | ८१२ |
| ३४ | वर्धा | ४७२५९ | २०३७३४ | ८६९४५८ | १०७३१९२ | १०७३१९ | ५३७ |
| ३५ | भंडारा | ६७३७५ | २९०४५४ | ८२१११० | १११११५६४ | १११११५६ | ५५६ |
| ३६ | गोंदिया | ८१२०७ | ३५००८३ | ७७७७९० | ११२७८७३ | ११२७८७ | ५६४ |
| ३७ | चंद्रपूर | १३९२५१ | ६००३११ | ११२३५४० | १७२३८५१ | १७२३८५ | ८६२ |
| ३८ | गडचिरोली | ९५०८० | ४०९८९० | ५५९३४१ | ९६९२३१ | ९६९२३ | ४८५ |
| राज्याचीएकूण | | २५०५३०० | १०८००३५० | ५९२१६०३१ | ७००१६३८१ | ७००१६३८ | ३५००८ |

Scanned by CamScanner